दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● मंगळवार २३ जूले २०२४ ● आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३४१ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता *
समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक ,सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भीड दैनिक
मो.न.9422660077

## स्वत:च्या स्वार्थासाठी साहेबांच्या मृत्यूचं राजकारण-केदार दिघे

**वादळवार्ता/मुंबई**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात विविध घडामोडी घडताना दिसत आहेत. त्यातच गुरुपौर्णिमेच्या पूर्वसंध्येला प्रवीण तरडे दिग्दर्शित ‘धर्मवीर २’ या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला. या ट्रेलर लाँच सोहळ्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक राजकीय नेते आणि सिनेसृष्टीतील कलाकार उपस्थित होते. ‘धर्मवीर २’ हा चित्रपट एकनाथ शिंदे यांचे बंड आणि धर्मवीर आनंद दिघेंच्या मृत्यूचे गूढ यावर आधारित असल्याची चर्चा सध्या पाहायला मिळत आहे. आता यावरुन आनंद दिघे यांचे पुतणे केदार दिघे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर निशाणा साधला आहे.

“गेल्या अडीच वर्षाच्या काळात एकनाथ शिंदेंनीच आनंद दिघेंचा मृत्यू कशामुळे झाला, याची माहिती दिली होती. तो हार्टअटॅकमुळे झाला, असं त्यांनी त्यावेळी सांगितलं होतं. मग आता निवडणुकीपूर्वी किंवा काही महिन्यांपासून तुमचे नेते दिघे साहेबांच्या मृत्यूचं गूढ आम्ही बाहेर काढू, असं सांगत आहेत, याचा अर्थ नेमका काय?” असा प्रश्न केदार दिघे यांनी उपस्थित केला आहे. “गेल्या22वर्षांपासूनगप्पकाबसलात?” “याचाच अर्थ तुम्ही स्वत:च्या स्वार्थासाठी २२ वर्ष साहेबांच्या मृत्यूचं राजकारण करत राहणार का? तुमच्या या दैवतावर, तुम्हाला ज्याने घडवलं अशा नेत्यावर जेव्हा अन्याय होत होता, तेव्हा तुम्ही गेल्या २२ वर्षांपासून गप्प का




बसलात?” असेही केदार दिघेंनी म्हटले. “ ते शिंदेंना का सांगतील?” “हा तर दिघे साहेबांच्या हिंदुत्वाचा शिंदे आणि धर्मवीर दोन च्या टीम कडून अपमान आहे! तुझ्या आणि हिंदुत्वाच्या मध्ये इथून पुढे मी जरी आलो तरी मला बाजूला सारून हिंदुत्वाला मिठी मार.... असा डायलॉग दिघे साहेबांच्या तोंडी धर्मवीर दोन चित्रपटात टाकण्यात आला आहे. मुळात दिघे साहेबांचे हिंदुत्व हे बाळासाहेबांचं हिंदुत्व होतं. बाळासाहेबांच्या हिंदुत्वाचा प्रचार प्रसार दिघे साहेब करत होते, मग दिघे साहेब कुणाच्याही हिंदुत्वाच्या मध्ये कशासाठी येतील? आणि ते शिंदेंना का सांगतील?” असा प्रश्नही केदार दिघेंनी उपस्थित केला होता. दरम्यान ‘धर्मवीर २’ या चित्रपटाच्या ट्रेलरवरुन सध्या राजकीय वातावरण तापले आहे. या ट्रेलरच्या शेवटी मंगेश देसाई हे संपूर्ण महाराष्ट्राला पडलेला एक प्रश्न विचारु? दिघे साहेबांच्या मृत्यूबद्दलचा? असा प्रश्न क्षितिज दाते यांना विचारताना दिसत आहे. यावरुनच सध्या सर्वत्र राजकारण तापलेलं दिसत आहे. त्यामुळे आता केदार दिघे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर एकनाथ शिंदे काय उत्तर देणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

## दत्तराम सोनबा पाटील कौशल्य यांचे निधन



नांदेड प्रतिनिधी नांदेड : लोहा तालुक्यातील उमरा येथील नागरिक दत्तराम सोनबा पाटील कौशल्य (वय ६० वर्षे) यांचे दि.२२-जुलै सोमवारी दुपारी १ :१५ वाजता निधन झाले असून त्यांच्या पार्थिवावर दि.२३-जुलै रोजी सकाळी ११ वाजता उमरा येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. कै.दत्तराम सोनबा पाटील कौशल्य यांचे पश्चात-दोन भाऊ, दोन बहिणी एक मुलगा,तीन मुली,सुन,असा मोठा परिवार असून तिरुपती कौशल्य यांचे ते वडील तर केशव पाटील सिरसाट यांचे मेहुणे होत.

## युसूफवडगांव पोलिस स्टेशनच्या हद्दीत अवैध धंद्याचा सुळसुळाट पोलिस मात्र हफ्ते घेऊन सुस्त.

केज/प्रतिनिधि

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील पोलिस स्टेशन हे बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील पोलिस स्टेशन असुन या पोलिस स्टेशनच्या हद्दीत ५९ गावांचा समावेश असुन त्याचे बरोबर सर्वात मोठी हद्द असलेले पोलिस ठाणे म्हणुन यांची ख्याती आहे.त्यामुळे याठिकाणी बदली करून घेण्यासाठी अधिकारी वाटेल ती रक्कम देण्यासाठी तयार असतात अशा या पोलिस स्टेशनच्या हद्दीत गेल्या महिन्यापासुन अवैध धंद्याचा सुळसुळाट वाढला आहे मात्र याकडे पोलिसांचे अर्थपुर्ण दुर्लक्ष होत आहे.

युसूफवडगांव पोलिस ठाणे हद्दीत गेल्या काही दिवसांपासून अवैध धंदे तेजीत असुन हद्दीत सर्वत्र ठिकाणी अवैध धंद्याचा सुळसुळाट वाढला आहे. गावोगाव मटका बुकी, अवैध गुटखा विक्री व पार्सल तसेच अवैध दारू विक्री व दारू पार्सल मोठ्या प्रमाणावर होत आहे.या मटक्या व दारूमुळे कित्येकांच्या संसाराची राखरांगोळी होत आहे.तरूण मुलांना यांचे व्यसन लागुन ते व्यसनाधीनतेच्या आहारी गेले आहेत.यामुळे युवी पीढी बरबाद होण्याच्या मार्गावर आहे पण याचे मात्र पोलिस प्रशासनाला काही घेणे देणे नाही.त्यांना फक्त महिन्यांकाठी या अवैध धंद्यावाल्याकडुन येणाऱ्या हफ्याची चिंता आहे.कारण यांच्यावर कारवाई करावी तर महिन्याकाठी येणारा मलिदा आपल्या मिळणार नाही म्हणून ते देखील याकडे कानाडोळा करतात कारण एक विचार जर केला तर या ५९ गावांमध्ये प्रत्येक ठिकाणी ३/४ अवैध धंदे वाले असतात मग यांच्याकडून तर महिन्याकाठी एकत्र केला तर लाखो रुपयांचा हप्ता या मिळतो.इतकेच नव्हे तर पोलिस स्टेशनला फिर्याद देण्यासाठी व ती परत किंवा समेट घडल्यानंतर पण पैसे लागतात रक्षण करते जर असे वागत असतील तर मग सर्वसामान्य जानतेने कुठे जायचे असा प्रश्न पडतो.

## राहुरी येथील वकील आढाव दांपत्य दुहेरी हत्याकांडातील आरोपींची नाशिक मध्यवर्ती कारागृह येथे रवानगी

**संतोष औताडे-**
**अहमदनगर प्रतिनिधी**

राहुरी पोलीस स्टेशन गुरंनं.७५/२०२४ सत्र न्यायालय खटला क्रमांक. १२६/२०२४ मधील आरोपी नं. १ किरण नानाभाऊ दु?शग आरोपी नं. २. भैया उर्फ सागर साहेबराव खांदे आरोपी नं. ३. शुभम संजीत महाडीक आरोपी नं. ५. बबन सुनील मोरे यांना अहमदनगर माननीय सरकारी वकील सो श्री उज्वल निकम यांच्या प्रयत्नाने माननीय न्यायालयाने जिल्हा बाहेर वर्ग करण्याची राहुरी पोलीस व




जेल अधीक्षक राहुरी यांनी केलेली विनंती नुसार जिल्हा बाहेर वर्ग करण्याची परवानगी दिल्याने नाशिक मध्यवर्ती कारागृह येथे रवानगी करण्यावर शिक्कामोर्तब झाल्याने सदर चारही आरोपींना राहुरी पोलिसांनी नाशिक मध्यवर्ती कारागृह येथे आज रोजी जमा केले आहे. तसेच आरोपी क्रमांक चार हर्षल ढोकणे हा माफीचा साक्षीदार झाल्याने माननीय न्यायालयाने त्यास राहुरी सब जेल येथेच ठेवण्याचे आदेशित केले आहे. सदरची कारवाई माननीय न्यायालयाच्या आदेशाने व पोलीस अधीक्षक श्री राकेश ओला साहेब, अप्पर पोलीस अधीक्षक श्री वैभव कुलूबर्मे, पोलीस उपविभागीय अधिकारी बसवराज शिवपूजे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय ठेंगे, पोलीस उपनिरीक्षक चारुदत्त खोंडे,पोलीस हेडकॉन्स्टेबल 2212/ बाळासाहेब महंडुळे, पोलीस नाईक 561/ संभाजी बडे, पोलीस नाईक 1010/ उत्तरेश्वर मोराळे पोलीस कॉन्स्टेबल 2648 अंबादास गीते, पोलीस कॉन्स्टेबल 786/ इफतेखार सय्यद, पोलीस कॉन्स्टेबल 1670 प्रतीक आहेर यांनी पार पाडले आहे.

## किशोर वीर यांना आयआयटी तिरुपती येथून पब्लिक पॉलिसी मध्ये पदव्युत्तर पदवी प्रदान




बीड प्रतिनिधी - आयआयटी,भारतीय प्रौद्योगिक संस्थान तिरुपती, येथून किशोर बबन वीर यांना पब्लिक पॉलिसी मध्ये पदव्युत्तर पदवी मिळाली. तसेच त्यांची वर्ल्ड रिसॉर्स इन्स्टिटयूट मध्ये जुनिअर प्रोग्राम असोसिएट म्हणून निवड झाली आहे. WRI हि संस्था पूर्ण जगात मानव कल्यानासाठी काम करते. बीड शहराजवळील एका छोट्याशा कर्झणी गावातील बबन वीर यंच्या शेतकरी पुत्राला हा मान मिळाला आहे. शैक्षणिक अभ्यास, जिद्द, चिकाटी, एकाग्रता व काहीतरी करण्याची ज्यांच्यामध्ये धमक असते. त्याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणून या छोट्याशा ग्रामीण भागातील विद्यार्थ्याकडे पाहिले जात आहे. त्याचा आदर्श सर्वांनी घेणे आवश्यक आहे. त्याचे कर्झणी गावात सर्व स्तरातुन कौतुक व स्वागत,अभिनंदन होत आहे.

## माँसाहेब प्रेरणा ऑर्गनायझेशनच्या वतीने सुर्डी (थोट) येथे वृक्षारोपण



**बीड/प्रतिनिधी**

आई-नाना प्रतिष्ठान बीड संचलित, माँसाहेबप्रेरणा ऑर्गनायझेशन बीड, महाराष्ट्र राज्याच्यावतीने बीड तालुक्यातील सुर्डी (थोट) येथे माँसाहेबप्रेरणा ऑर्गनायझेशनच्या संस्थापक अध्यक्षा ॲड.प्रेरणा सूर्यवंशी यांनी शेतकर्यांच्या बांधावर जावून फळांच्या व फुलांच्या विविध प्रकारच्या ४० रोपांचे वृक्षारोपण केले. या वृक्षारोपण कार्यक्रमास शेतकऱ्यांनी स्वकष्टाने उत्स्फुर्तपणे खड्डेखोदून श्रमदानाचे मोलाचे सहकार्य केले. तसेच महिलांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला तसेच वृक्षसंगोपन करण्याची हमी ॲड.प्रेरणा सूर्यवंशी यांना दिली. याप्रसंगी उपस्थित महिला व शेतकर्यांना ऑर्गनायझेशनच्या संस्थापक अध्यक्षा ॲड.प्रेरणा सूर्यवंशी यांनी झाडाचे आणि वृक्ष लागवडीचे महत्व अनेक वेगवेगळी उदाहरणे देवून सांगितले. वृक्ष लागवड चळवळ देशभरात विशाल व्हावी ही अपेक्षा व्यक्त केली. या कार्यक्रमास मौजे सुर्डी (थोट)चे ग्रा.पं.सदस्य दयानंद उबाळे यांनी अथक परिश्रम घेवून हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. या कार्यक्रमास गावातील प्रतिष्ठीत नागरीक डावकर नाना, रामहरी उबाळे, नवनाथ (नाना) डोईफोडे, भैय्यासाहेब उबाळे, उर्मिला उबाळे, विशाल डोंगरे, हरिभाऊ डोंगरे, बबन पठाण, महेश डोंगरे, दादाराव थोटे, शालन उबाळे, गणेश थोटे, बंडू उबाळे, मोरे यांच्यासह शेकडो शेतकरी, महिला, पुरुष, युवक, युवतींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# शरद पवारांच्याच सत्तेत मराठा आरक्षण गायब का होते?; अमित शाह यांचा सवाल



आगामी विधानसभा निवडणूकाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्वच पक्ष तयारीला लागले आहेत. पुण्यात भाजपचे अधिवेशन पार पडले. या अधिवेशनाला गृहमंत्री अमित शाह आले होते, लोकसभा निवडणुकीमध्ये केलेल्या कामाचं कौतुक करत सर्वांचे आभार त्यांनी आपल्या भाषणामध्ये मांडले. त्यासोबतच काँग्रेस नेते राहुल गांधी, उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्यावर घणाघाती टीका केली. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून शाहांनी पवारांना टार्गेट केलं. शरद पवार सत्तेत असले की मराठा आरक्षण का गायब होते? असा सवाल शाह यांनी केली आहे.

जेव्हा जेव्हा महाराष्ट्रात भाजपचे सरकार येते तेव्हा मराठा समाजाला आरक्षण भेटतं. पण शरद पवार यांचं सरकार येतं तेव्हा मराठा आरक्षण जाते. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना मराठा समाजाला आरक्षण भेटलं होतं, मात्र शरद पवार सत्तेत आल्यावर ते आरक्षण गायब झालं. त्यामुळे सत्तेत आल्यावरच मराठा आरक्षण का गायब होते? असा सवाल करत भ्रष्टाचारांचा सर्वात मोठा सरगणा म्हणजे शरद पवार असल्याचं अमित शाह म्हणाले. त्यासोबतच उद्धव ठाकरे यांना औरंगबजे फॅनक्लबचे नेता असल्याचं म्हटलं आहे.औरंगबजे फॅनक्लबचे उद्धव ठाकरे नेत आहेत. ते बाळासाहेबांचा वारसदार आहेत असे सांगतात पण ते कसाबला बिर्याणी देण्याची मागणी, छत्रपती संभाजीनगर नामांतराला विरोध करणाऱ्यांच्या मांडीवर जाऊन बसलेत. तुम्हाला लाज वाटली पाहिजे, अशा विखारी शब्दात शाहांनी ठाकरेंवरही निशाणा साधला. गेल्या 10 वर्षात आम्ही गरिबांचं कल्याण करण्याचं काम केलं आहे. काँग्रेस कधीही गरिबांचं कल्याण करू शकत नाही. बाबासाहेब आंबडेकरांचा अपमान इंग्रजांनी जेवढा नाही केला तेवढा अपमान काँग्रेसने केला. काँग्रेस देशात चुकीचा प्रचार करत आहेत. समाजीतील प्रत्येक वर्गासाठी आम्ही काम केलं असल्याचं अमित शाह यांनी म्हटलं आहे. पवारांवर केलेल्या टीकेनंतर राष्ट्रवादीचे नेते आणि राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी निशणा साधला आहे.भ्रष्टाचाऱ्यांच्या मांडीला मांडी लावून बसलेले अमित शहा जी तुम्ही आज पुण्यात येऊन आदरणीय पवार साहेबांवर टीका केली. मला तुम्हाला एवढंच सांगायचंय, तुम्ही आज ज्या बालेवाडी क्रीडा नगरीत हे भाषण केलं

## लाडकी बहीण योजनेची मी पहिली लाभार्थी : भावना गवळी

राज्य सरकारकडून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ मिळावा यासाठी राज्यभरातील लाखो महिला अर्ज करत आहेत. येत्या रक्षाबंधनाच्या दिवशी महिलांच्या बँक खात्यात लाडकी बहीण योजनेचे पैसे जमा होणार आहेत. त्यामुळे सर्वत्र लाडकी बहीण योजनेची चर्चाच आहे. विशेष म्हणजे शिवसेनेच्या नेत्या तथा विधान परिषदेच्या नवनिर्वाचित आमदार भावना गवळी यांनी आपण लाडकी बहीण योजनेची पहिली लाभार्थी असल्याचं म्हटलं आहे. भावना गवळी यांना लोकसभेच्या निवडणुकीवेळी तिकीट कापण्यात आलं होतं. विशेष म्हणजे भावना गवळी या 5 वेळा खासदार म्हणून निवडून आल्या होत्या. तरीही त्यांचं तिकीट कापण्यात आल्याने भावना गवळी या नाराज असल्याची चर्चा होती. यानंतर भावना गवळी यांना विधान परिषदेची संधी देण्यात आली. त्यामुळे भावना गवळी यांची नारीज दूर करण्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना यश आलं आहे. विशेष म्हणजे भावना गवळी यांनी लाडकी बहीण योजनेवर मजेशीर वक्तव्य केलं आहे. मी पाच वेळा खासदार म्हणून निवडून आली तरी उमेदवारी दिली नव्हती. मात्र मुख्यमंत्र्यांनी मला विधान परिषदेवर आमदार बनविले. त्यामुळे लाडकी बहीण योजनेची मी पहिली लाभार्थी आहे", असं भावना गवळी म्हणाल्या. "येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यातील महायुतीच्या नेत्यांना एकत्र बसवून निर्णय घ्यायचा आहे. माझ्या मनात कोणताही भेदभाव नाही. मी रुसवे फुगवे ठेवत नाही. माझा कोणाशी भेदभाव नाही. मी 25 वर्ष महिला खासदार म्हणून काम करत आहे. मी ठरवलं तर इकडे तिकडे करत अनेकांच्या भानगडी लावल्या असत्या. दिल्लीत मोठ्या पदावर असते. मात्र मी सर्वांना कामाशी जोडत गेले", असं भावना गवळी म्हणाल्या

## सोयाबीन पिकावरील रोग नियंत्रणासाठी उपाययोजना. सोयाबीन पिक पिवळे पडण्यावरील उपाययोजना :-

पेरणी लवकर झालेल्या ठिकाणी सोयाबीन पिवळे पडत असल्याची किंवा वाढ कमी होत असलेल्या तक्रारी येत आहे. बरेच ठिकाणी सोयाबीन पेरणी पूर्ण होऊन पिके २० ते २५ दिवसाची झाली आहेत. तिथेही सोयाबीन पिवळे पडण्याची समस्या दिसून येत आहे. सोयाबीन पीक उगवणीनंतर पिवळे पडण्याची अन्नद्रव्याची कमतरता आणि रोगाचा प्रादुर्भाव अशी मुख्यतः दोन कारणे दिसतात. वाढीच्या सुरुवातीलाच सोयाबीन पीक पिवळे पडत असेल तर ते प्रामुख्याने अन्नद्रव्याची कमतरतेमुळे आणि शेवटच्या अवस्थेत पिवळे पडत असल्यास ते विषाणूजन्य रोगामुळे असा ठोकताळा करता येतो.

**लक्षणे** :- चुनखडीयुक्त जमिनीमध्ये वेगवेगळ्या अन्नद्रव्यांचे शोषण होत नसल्यामुळे सोयाबीन पिवळे पडते. चुनखडीयुक्त जमिनीचा पीएच वाढतो. वाढलेल्या पीएच मध्ये काही अन्नद्रव्ये पिकांना उपलब्ध होऊ शकत नाहीत. चुन्यामुळे नत्र, स्फुरद, पालाश, मँगेनीज, जस्त, तांबे, मॅग्नेशिअम आणि लोह यांच्या उपलब्धतेवर परिणाम होतो. सोयाबीन पिकामध्ये प्रामुख्याने गंधक, जस्त आणि लोह यांची कमतरता असल्याने पीक पिवळे पडते. गंधक कमी पडल्यास पानामध्ये हरितद्रव्य १८ टक्क्यांपर्यंत कमी तयार होते.

**उपाययोजना** :-

सोयाबीन पिवळे पडत आल्यास खालील विद्राव्य खताची फवारणी घ्यावी. (प्रमाण प्रति लिटर पाणी)

**नत्र** अन्नद्रव्याची कमतरता असल्यास : युरिया २० ग्रॅम. गंधक अन्नद्रव्याची कमतरता असल्यास : सल्फेटयुक्त खत ५ मि.लि. लोह व जस्त अन्नद्रव्याची कमतरता असल्यास : सूक्ष्म अन्नद्रव्ये २ (मायक्रोन्यूट्रियंट ग्रेड-२) ५ मि.लि. किंवा चिलेटेड फेरस ५ ग्रॅम. आणि चिलेटेड झिंक ५ ग्रॅम. स्फुरद अन्नद्रव्याची कमतरता असल्यास : १२:६१:० किंवा १७:४४:० किंवा ०:५२:३४ खत ५ ग्रॅम. बोरॉन अन्नद्रव्याची कमतरता असल्यास सूक्ष्म अन्नद्रव्ये २ (मायक्रोन्यूट्रियंट ग्रेड-२) ५ मि.लि. कमतरता लक्षात येत नसल्यास, १९:१९:१९ खत १०० ग्रॅम किंवा अमोनिअम सल्फेट २०-२५ ग्रॅम किंवा झिंक चिलेटेड २५ ग्रॅम किंवा सूक्ष्म अन्नद्रव्य २५ मि.लि. अधिक अमिनो ॲसिड यांची फवारणी करावी.

विषानुजन्य रोग व्यवस्थापन :- सोयाबीन पिवळा मोझॅक, मोझॅक :- या रोगाचा प्रसार पांढऱ्या माशी मार्फत होतो. मोझॅक:- सोयाबीन पिकावरील मोडॉक हा विषाणूजन्य रोग असून तो सोयाबीन मोझॅकव्हायरस नावाच्या विषाणूमुळे होतो. रोगग्रस्त झाडांच्या पानांच्या शिरा पिवळ्या पडतात तसेच फिक्कट हिरवे व पिवळसर हिरवे रंगाचे पट्टे पानांवर दिसून येतात. झाडांची पाने गुंडाळली जातात. पानांवरील पेशी नष्ट होतात व झाड वाळते. पिवळा मोझॅक :- पिवळा मोझॅकहा विषाणूजन्य सोयाबीन पिकावर रोग असून तो मुगबिन येलो मोझॅकया विषाणूमुळे होतो. या रोगाचा प्रसार प्रामुख्याने पांढरी माशी या किटकाद्वारे होतो. रोगट झाडांच्या पानांचा काही भाग पिवळसर दिसून येतो. शेंड्याकडील पाने पिवळी पडून आकाराने लहान होतात बाधित झाडाची वाढ पूर्णपणे खुंटते. पाने सुरकतून जातात. फुलांची व शेंगाची संख्या देखील कमी होते.

**एकात्मिक व्यवस्थापन :-** रोगाची लक्षणे दिसताच शेतातील रोगग्रस्त झाडे उपटून नष्ट करावीत. पिकामधील व बांधावरील तण नियंत्रण करावे. सोयाबीन पिकात आंतरपीक व मिश्र पीक घेतल्यास रोगाचे प्रमाण कमी आढळते. पांढरी माशी व मावा किडीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पिवळे चिकट सापळे (१५ x ३० सेमी) सोयाबीन पिकात हेक्टरी १० ते १२ प्रमाणे लावावेत. या विषाणूजन्य रोगाचा प्रसार प्रामुख्याने पांढरी माशी व मावा या किडीद्वारे होत असल्याने या किडींच्या नियंत्रणासाठी इमिडॅक्लोप्रीड १७.८ टक्के एस.एल २.५ मि.ली. किवा फ्लोनिकामिड ५०% डब्ल्यू जी ३ ग्रॅ. किंवा थायामिथॉक्झाम २५ % डब्ल्यू जी ३ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे पावर पंपासाठी कीटकनाशकाची मात्रा तीनपट वापरावी. कीटकनाशकांचा वापर करताना हातमोजे व तोंडावर मास्कचा वापर करावा.

## चोरीच्या ११ मोटरसायकल राहुरी पोलिसांकडून हस्तगत चार आरोपी जेरबंद चोरीच्या गाड्यांवर खोटी नंबर प्लेट बसून देणाऱ्या रेडियम दुकानदारालाही केली अटक.

**संतोष औताडे- अहमदनगर प्रतिनिधी** गेल्या काही दिवसापासून राहुरी शहर व इतर ठिकाणाहून मोटरसायकलीचे प्रमाण वाढले होते. Db पथक मोटरसायकल चोरणाऱ्या टोळीचा शोध घेत होते. त्यावेळी त्यांनी सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय बातमिदारा मार्फत दोन संशयतांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी सुरुवातीला उडवा उडवीची उत्तरे दिली. परंतु खात्रीशीर खबर असल्याने 1)नावेद इब्राहिम शेख वय 23 रा जातप ता राहुरी,2)मंगेश विष्णू ठाकर वय 22 रा-सोमय्या फार्म ता- राहुरी या दोघांना दिनांक 14/07/2024 रोजी अटक केल्यानंतर त्यांनी चोरलेली गाडी ही आरोपी 3)किशोर अंकुश पवार व 19 रा.उंदीर गाव ता- श्रीरामपूर त्याच्याकडे दिलेली असल्याचे सांगितल्याने त्यालाही दिनांक 15/07/2024 रोजी अटक केली. तपासादरम्यान एकूण दोन मोटसायकल जप्त करण्यात आल्या होत्या.तसेच यातील आरोपी नावेद इब्राहिम शेख वय 23 रा जातप ता राहुरी याने देवळाली प्रवरा व टाकळीमिया या ठिकाणावरून अजून दोन मोटरसायकल चोरल्याची कबुली दिल्याने त्याला मान्य न्यायालयाकडून राहुरी पोलीस स्टेशन गुरं न 603/24 मध्ये वर्ग करून तपास करत असताना आरोपीने सदर गुन्ह्यात चोरलेली मोटरसायकलवर कलर्स रेडियम राहुरी फॅक्टरी येथे जावेद रज्जाक शेख याचे कडून सदर चोरीच्या मोटरसायकल वर बनावट नंबर प्लेट लावून विल्हेवाट लावल्याची कबुली दिल्याने व नंबर प्लेट लावताना सदर गाडी चोरीची असून तीचे कागदपत्राची कुठलीही खातरजमा न करता नंबर प्लेट लावल्याने आरोपी जावेद रज्जाक शेख यास दिनांक 19/07/2024रोजी अटक करून 1)नावेद इब्राहिम शेख वय 23 रा जातप ता राहुरी 2)जावेद रज्जाक शेख राहणार संक्रापूर तालुका राहुरी या दोघांनाही मान्य न्यायालयापुढे दिनांक २०/७/२०२४ रोजी हजर ठेवून पोलीस कस्टडीची मागणी केली असता सरकारी अभियोक्ता श्री गागरे यांनी सरकारी पक्षाचीवबाजू मांडून 3 दिवस पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केली. पोलीस कस्टडी दरम्यान आरोपी नावेद इब्राहिम शेख वय 23 रा जातप ता राहुरी याने अजून नऊ चोरलेल्या मोटरसायकल तपासा दरम्यान काढून दिल्या. अशा प्रकारे राहुरी पोलिसांनी एकूण 11 मोटरसायकल जप्त करून राहुरी पोलीस स्टेशन हद्दीतील व श्रीरामपूर पोलीस स्टेशन हद्दीतील



एकूण 11 गुन्हे उघडकिस आणलेत.

सदर कारवाई मा.राकेश ओला पोलिस अधीक्षक सो,अहमदनगर, मा.वैभव कुलुबर्मे अपर पोलिस अधीक्षक अहमदनगर, मा. बसवराज शिवपूजे उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीरामपुर विभाग जि. अहमदनगर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री संजय आर.ठेंगे पोलीस निरीक्षक राहुरी पोलीस स्टेशन, सहायक पुलिस निरीक्षक देवेंद्र शिंदे, रवींद्र पिंगळे, पोलीस उपनिरीक्षक चारुदत्त खोंडे, धर्मराज पाटील, सहाय्यक फौजदार तुळशीराम गीते,पोहेकॉ/ सुरज गायकवाड, संदिप ठाणगे, राहुल यादव, पोना/ प्रविण बागुल, पोकों/प्रमोद ढाकणे, नदीम शेख,सचिन ताजणे,पोको गोवर्धन कदम,जयदीप बडे, अजिनाथ पाखरे,सतीश कुऱ्हाडे,अंकुश भोसले, आजिनाथ पाखरे मोबाईल सेल श्रीरामपुर चे पोना/सचिन धनाड, पोना/संतोष दरेकर यांनी केली आहे पुढील तपास सहाय्यक फौजदार आहेर हे करत आहेत.

*राहुरी पोलिसांच्या वतीने नंबर प्लेट बनवणाऱ्या व्यावसायिकांना आव्हान करण्यात येते की आपल्याकडे कोणताही ग्राहक वाहनावर नंबर प्लेट बसविण्यास आला असता सदर वाहनाचे आरसी बुक, चेसीस नंबर, इंजिन नंबर याची तपासणी करून खात्री करून नंबर प्लेट बसवाव्या. चोरीच्या मोटरसायकल वर कुणी बनावट नंबर प्लेट बसवताय असा संशय आल्यास तात्काळ राहुरी पोलिसांशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# केअर कंपॅनियन प्रोग्राम द्वारे माता व बाल म्रुत्युवर नियंत्रण मिळविणे होणार सोपे.

**चंद्रपूर/प्रतिनिधी**

उप जिल्हा रूग्णालय वरोरा जिल्हा चंद्रपूर येथे दिनांक १९ जुलै २०२४ ला केअर कंपॅनियन प्रोग्राम चे आयोजन करण्यात आले होते.हा कार्यक्रम डॉ प्रफ्फूल खूजे वैद्यकीय अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली वंदना विनोद बरडे अधीसेवीका यांनी आयोजित केला होता.या कार्यक्रमाचे नूरा हेल्थ च्या वतीने मुख्य स्पिकर डॉ निलेश गावंडे हे होते.हा ट्रेनिंग प्रोग्राम सर्व परिसेविका,अधिपरीचारीका,कौन्सिलर,ए.एन.एम. स्टाफ व सर्व विभागांचा नर्सिंग स्टाफ यांच्या करीता आयोजीत करण्यात आला होता.या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश सर्व माता व बालकांसोबतच ईतर रुग्णांना उच्च दर्जाचे



आरोग्य प्रशिक्षण रुग्णालयांत पुरविणे सोबतच रुग्णालयातून सुटी झाल्यानंतर घरी नातेवाईक यांनी रुग्णांची कशी काळजी घ्यायची याचे प्रशिक्षण सर्व परीचारिकांना व संबंधित कर्मचारी यांना देण्यात आले. आणी या सर्व प्रशिक्षणार्थीनी रुग्णांना व नातेवाईक यांना दररोज प्रशिक्षित करणे आहे.रुग्णालयातून सुट्टी झाल्यावर रूग्णांची घरी हेळसांड होऊ नये योग्य ती काळजी घेण्यात यावी यासाठी प्रक्षिशीत केल्या जाते. या प्रशिक्षणामार्फत एक टोल फ्री नंबर आहे त्यावर नंबर डायल केला तर तुम्हाला गरोदर माता व असंसर्गजन्य आजारांविषयी माहिती व्हाट्स ऍप द्वारे मिळतें. लहान बालकांचे आजार, गरोदर माता, ज्येष्ठ नागरिक व मधुमेह, उच्च रक्तदाब,कॉन्सर, ईत्यादी प्रकारचीं माहीती व सल्ला दिला जातो. कोणीही हा १८००८९३६६९ नंबर डायल करून योग्य मार्गदर्शन, माहिती घेता येते व निरोगी जिवन जगता येत. तळागाळातील लोकांपर्यंत पोहचुन त्यांना आजारांबाबत जाग्रुत करून निरोगी जिवन देणें हा शासनाचा उद्देश आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमात चार प्रकारचे फ्लिप चार्ट (प्रसूती-पूर्व, प्रसूती-पश्चात, नवजात बालक व असंसर्गजन्य आजार) परिचारिकांना देण्यात आलेले आहेत त्याद्वारे त्या आपापल्या वॉर्ड मध्ये आरोग्यविषयी माहिती रुग्ण व त्यांचे नातेवाईकांना देतात व त्यांनतर रुग्णांना टेक-अवे (माहिती पुस्तिका) देण्यात येते यांवर संपूर्ण माहिती दिली आहे. प्रत्येक कुटूंबाला त्यांचे वाटप केले जाते. या कार्यक्रमांचे सूत्रसंचालन रूबीना खान यांनी केले.नेहा ईंदूरकर एनसिडी कौन्सिलर यांनी या कार्यक्रमांची संकल्पना समजून सांगितली. वंदना बरडे यांनी प्रास्ताविक केले व आभारप्रदर्शन संगिता नकले यांनी केले. याचे प्रात्यक्षिक रुग्णालयात रुग्णांसोबत व नातेवाईक यांच्या सोबत करण्यात आले आणि हे प्रात्यक्षिक वैष्णवी भोंडवे अधिपरीचारीका यांनी घेतलें.या कार्यक्रमामुळे माता म्रुत्यु,बाल म्रुत्यु, इतर म्रुत्यु कमी होऊन चांगल्याप्रकारे आरोग्य सेवा मीळू शकते.आणी वेळेतच आजारांवर नियंत्रण मिळवता येते.

## पोषण आहाराच्या पाकिटात निघालं मेलेल्या उंदराचं पिल्लू, गर्भवती महिला आणि बालकांच्या जीवाशी खेळ?

राज्य शासनाकडून गर्भवती माता आणि बालकांना पोषण आहार दिला जातो. पण राज्यातील अंगणवाडी आणि शाळांमधून दिला जाणारा पोषण आहार हा खरंच पोषण आहार आहे की विष आहे? असा प्रश्न निर्माण व्हावा अशा घटना समोर येताना दिसत आहेत. पोषण आहार या शब्दाचा अर्थ म्हणजे पोषक आहार किंवा संतुलित आहार. हा आहार सामान्य आरोग्य आणि कल्याणास प्रोत्साहन देतो, असं मानलं जातं. पण हा पोषण आहार गर्भवती माता आणि बालकांसाठी किती सुरक्षित आहे? असा प्रश्न निर्माण होतोय. विशेष म्हणजे असा प्रश्न निर्माण व्हावा, अशी पहिली घटना नाही. याआधीदेखील अनेकदा अशाप्रकारच्या घटना घडल्या आहेत. तरीदेखील झोपलेल्या प्रशासनाला




जाग येत नसल्याचं स्पष्ट होतंय. कारण आता जळगावात पोषण आहाराशी संबंधित एक संतापजनक प्रकार समोर आला आहे. सांगलीत काही दिवसांपूर्वी पोषण आहारात मेलेला साप सापडल्याची धक्कादायक बातमी समोर आली होती. तसेच वर्षभरापूर्वी पुण्यातील एका शाळेत पोषण आहारातून 60 विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याची माहिती समोर आली होती. पण या घटनांमधूनही प्रशासन झोपेतून जागी होताना दिसत नाही. जळगावात पुन्हा एकदा तसाच प्रकार बघायला मिळाला आहे. जळगावात पोषण आहाराच्या पाकिटात चक्क मेलेलं उदाराचं पिल्लू आढळलं आहे.

## शेतकरी कामगार पक्षाचे सचिन राजे येरुणकर यांच्या प्रयत्नामुळे उलवे मध्ये प्रकाशाची व्यवस्था.

**उरण/प्रतिनिधी**

सेक्टर ८ बी उलवे नोड येथे गेली ७ वर्ष रस्त्यावर दिवे नव्हते.आणि सेक्टर ८ बी हा भाग खूप आतमध्ये असल्यामुळे तिकडे रस्त्यावर अंधार होता आणि नको ते प्रकार घडत होते त्यामुळे रहिवाशी यांच्या मध्ये भीतीचे वातावरण होते.या सदर घटनेची व गंभीर समस्येची कल्पना सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल जाधव यांनी शेतकरी कामगार पक्षचे युवानेते सचिन राजे येरुणकर यांना दिली. स्वतः सचिन राजे येरुणकर यांनी लोकशाही मार्गाने कायदेशीररित्या शासनाकडे पत्रव्यवहार करून,पाठपुरावा करून फक्त २ आठवड्यामध्ये उलवे ८ बी रस्त्यावर व परिसरात लाईटस लावून दिल्या. नेहमी अंधारात असलेला परिसर सचिन राजे



येरुणकर यांच्या प्रयत्नामुळे उजेडात आला. त्या परिसरात अंधाराऐवजी आता लख्ख प्रकाश पडला आहे. आता नागरिकांना प्रवास करणे सुरक्षित व सोप्पे झाले आहे.सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीकोणातून सचिन राजे येरुणकर यांनी केलेल्या या कामाचे सर्वत्र कौतुक होत आहे. सेक्टर ८ मधील रहिवाशी यांनी शेतकरी कामगार पक्षाचे युवा नेते सचिन राजे येरुणकर यांचे प्रत्यक्ष भेट घेउन आभार मानले.ह्यावेळी सचिन घरत (उप सरपंच ), सुहास देशमुख, राजेंद्र घरत,राकेश घरत, रोशन म्हात्रे, हेमंत पाटील, रमेश ठाकूर, अण्णा घरत, मिलिंद ढोके,चंद्रकांत बाकळकर, विठ्ठल जाधव, प्रदीप भंडारे,जितू राणे, प्रशांत थोरात, राकेश बदावटे, मुकेश मोरे, कोकणकर संघटनेचे मुरकर साहेब, जेष्ठ नागरिक, सेक्टर ८ बी येथील रहिवाशी उपस्थित होते.

## स्वाराती रुग्णालय आहे कि लुटारूचा अड्डा ? रुग्णाचे बेहाल, डॉक्टर करतायत रुग्णांची पळवा पळवी !

**अंबाजोगाई/प्रतिनिधी**

अंबाजोगाई स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय हे गोरगरीब रुग्णांची जीवन संजीवनी मानली जाते मात्र येथे मागील काही महिण्यापासून रुग्णाचे हेळसांड होत असून रुग्णांची प्रचंड लूट केली जात आहे. अति दक्षता वार्डात जाण्यापूर्वी देवासमोर कर्मचारी १०० रुपये ठेवायले सांगतात डिस्चार्ज होताना कर्मचाऱ्यांना पैसे



द्यावे लागतात अद्यावत ब्लड बँक असताना शहरातील बाहेरच्या लॅब वाल्याकडे रक्त तपासणी साठी पाठवले जाते विशेषतः त्यांनी सांगितलेल्या लॅब मध्येच जावे लागते किंबहुना इतर लॅब चा रिपोर्ट आणला तर ते पाहतही नाही परिणामी रुग्णांना आर्थिक लुटिचा सामना करावा लागतो. ठराविक औषध वगळता बहुतांश गोळया औषधे बाहेरच्या मेडिकल वरून घ्यावी लागतात दवाखाना चे प्रधानमंत्री जनऔषधी मेडिकल हे नावालाच असून औषध विक्री मात्र इतर मेडिकल च्या भावाने होत असून इथेही रुग्णांची लूट होत आहे त्याच बरोबर येथील शासकीय सेवेत असणारे डॉक्टर पत्नी व नातेवाईकांच्या नावावर काढलेल्या खाजगी रुग्णालयात रुग्णसेवा देण्यात व्यस्त असल्याने स्वार्थी रुग्णालयातील रुग्णांना वेळेत उपचार होत नाहीत तसेच येथे येनाऱ्या रुग्णांची पळवा पळवी येथील डॉक्टर करत त्यांच्या खाजगी रुग्णालयात उपचारासाठी येण्यास सांगतात येथेही त्यांची लूट होत असून स्वाराती रुग्णालय आहे की लुटारूचा अड्डा हा प्रश्न पडत असून स्वाराती रुग्णालयातील रुग्णांची हेळसांड व लूट थांबवण्याकरता कोणताही सामाजिक कार्यकर्ता पुढे सरसावत नसल्याने अंबाजोगाई डिजिटल मीडिया परिषद पुढे येत स्वरातीचे अधिष्ठाता यांना निवेदन दिले यावेळी उपाध्यक्ष संजय जोगदंड, मार्गदर्शक सतीश मोरे, सचिव मोहम्मद फैझान, गजानन चौधरी, उत्तरेश्वर शिंदे, अहमद पठाण हे उपस्थित होते स्वरातीर येथे कार्यरत डॉक्टरांच्या खाजगी प्रॅक्टिस बंद करावी तसेच रुग्णांची होणारी आर्थिक लूट थांबवली गेली नाही तर डिजिटल मीडिया परिषदेचे अध्यक्ष अभिजीत लोमटे हे आजपासून आमरण उपोषणास बसणार आहेत. या उपोषणाला डिजिटल मीडियाचे सर्व पत्रकार व विविध पक्षाचे नेते मंडळी सामाजिक कार्यकर्ते यांनी पाठिंबा दिला आहे.

## मराठा आरक्षण, तीर्थक्षेत्र निधी साठी २४ तारखेला अमर उपोषण !

### अमर उपोषणा दरम्यान आता मेलो तरी हरकत नाही - रोहन गलांडे पाटील

**केज/प्रतीनिधी**

मराठ्यांचे दैवत श्री. मनोज जरांगे पाटील हे २० जुलै २०२४ पासून आंतरवाली-सराटी जि. जालना या ठिकाणी आमरण उपोषणास



बसणार आहेत.तरी मराठ्यांचे दैवत श्री. मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या विषयी महाराष्ट्र राज्य शासनाची भूमिका उदासिनतेची दिसून येत आहे.तरी मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांच्या २० तारखे पासुन सुरू होणाऱ्या उपोषणाची दखल घेऊन राज्य सरकारने केलेल्या मराठा समाजाच्या सगेसोयरे कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनात दि.२४/०७/२०२४ रोजी श्री संत नामदेव महाराज सभागृह येथे सकाळी १० वाजता रोहन गलांडे पाटील आमरण उपोषणाला बसणार आहे मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्य होत नाही तोपर्यंत आमरण उपोषण सुरूच राहील असे निवेदनाद्वारे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे. तसेच चिंचोली माळी येथील श्री संत नामदेव महाराज मंदिरासाठी तीर्थक्षषासाठी ५० लाख रुपये मंजूर झालेल्या निधीचे वितरण करून श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्राचे काम करु असे लेखी आश्वासना नंतर उपोषणाला स्थगिती देण्यात आली परंतू उपोषणाला स्थगिती देऊन ऐक महीना उलटुन सुध्दा काम सुरू केले नसल्याने परत २४/०७/२०२४ रोजी अमरण उपोषन सुरू करण्यात येणार आहे जो पर्यंत कामाला प्रेत्येशात कामाला सुरुवात केली जात नाही तोपर्यंत आमरण उपोषण सुरूच राहणार आहे असे अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे .

:

**सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी मुंडे यांनी लेखी आश्वासन देऊन श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र विकास कामाला सुरुवात केली नाही तरी यांच्या वर कायदेशीर कारवाई करण्यात यावी कारवाई होत नाही तोपर्यंत आमरण उपोषण.**

## गायरानसाठी करचुंडीच्या ग्रामस्थांचे जिल्हाधिकारी कार्यालय समोर धरणे आंदोलन

**बीड /प्रतिनिधी**

करचुंडी समस्त गावकरी बहुजन बांधव यांचे वतीने करचुंडी गावाला असणारी गायरान जमिनीचे कायदेशीर अधिकार म्हणजे, गावरात जमिन वापर करणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावाने करणे, ७/१२ उताऱ्यावर त्याची नोंद करणे इत्यादी मागणी करीता ते बीड जिल्हयातील खेडयापाडयातील गायरान जमिनीचा वापर करुन त्यावर अनेक प्रकारचे पीके घेवून आपले कुंटूंबाचे पालनपोषण करणाऱ्या शेतकऱ्यांना या मागणीचा लाभ घेणे करीता दि. २० जुलै पासून ते मागणी मान्य झालेचे लेखी पत्र संबंधित अधिकाऱ्याचे सहीचे मिळेपर्यंत करचुंडी गावातील गरीब दास महाराज सभागृह येथे बेमुदत धरणे आंदोलन जिल्हा अधिकारी कार्यालय समोर सुरू मौजे करचुंडी येथील जमीन नसलेल्या शेतकऱ्यांनी गावालगत असणारी (गायरान) जमीनीवर विविध प्रकारची नगदी पिके घेवून त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर या गावचे शेतकरी आपले कुंटूंबाचे उदरनिर्वाह पालनपोषण करीत आहे. या गावातील शेतकऱ्यांना शासनाच्या मिळणाऱ्या अनेक




सरकारी सुख सुविधा मिळत नाहीत. या गावातील बरेचसे शेतकरी अल्पभुधारक आहेत. आम्ही समस्त गावकरी करचुंडी येथील गायरान जमीन शेतकऱ्यांच्या नावावर होवून त्या जमिनीचा त्याला ७/१२ उतारा देणेकामी शासन स्तरावर व राजकीय स्तरावर वेगवेगळे पत्रव्यवहार केलेले आहेत. गायरान जमिनीचे कायदेशीर हक्क नसलेमुळे शेतकऱ्यांना शेतीला पुरक दुसरे जोडधंदे नाहीत. ना जमिनीत वीज घेता येते ना शेतकऱ्यांना सोलर पंप दिले जातात. तरी शेतकऱ्यांना अनुदान व पीकविमा योजना देवून या सर्व अडचणीतून बीड जिल्हयातील शेतकरी मुक्त झाला पाहिजे. तो प्रगतीशील शेतकरी झाला पाहिजे. हीच मागणी घेवून समस्त गाव मौजे करचुंडी ता. जि. बीड येथील गरीब दास महाराज सभागृह येथे दि २०/०७/२०२४ रोजीपासून शेकडो शेतकरी समूहाच्या उपस्थितीमध्ये सकाळी १०.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत आंदोलन सुरु राहणार आहे. सदरचे रॅली आंदोलन हे करचुंडी ते बीड पायी रैली दि. २२/०७/२०२४ रोजी सकाळी ०९.०० ते सायं.०५.०० वेळेत जिल्हयातील खेडयापाडयातील गायरान जमीन वापर करणाऱ्या शेतकऱ्यांकरीता असणार आहे. सदरचे आंदोलन हे पुर्णपणे शांततेत व लोकशाही मार्गाने होणार. प्रशासकीय यंत्रणेला कुठलाही त्रास होणार नाही याची आंदोलन शिष्टमंडळाच्या वतीने दक्षता घेतली आहे. आंदोलनामध्ये छोटेखानी भीमगीत गायनाचा व्याख्यान, प्रबोधन इत्यादी तसेच संविधान जनजागृती इत्यादी विषयावर चर्चा होणार आहे. तरी बेमुदत धरणे आंदोलनाला गालबोट लागू नये. सामाजिक शांततेचा भंग होऊ नये करीता आंदोलनाला कुठलेही अडचण येऊ नये करीता पोलीस परवानगी स्पिकर परवाना व पोलीस संरक्षण करीता मागणी करीत आहोत. आंदोलनातील मुख्य मागणी मान्य होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्याच सहीचे मागणी मान्य झालेचे पत्र मिळेपर्यंत हे आंदोलन सुरु राहणा बेमुदत धरणे आंदोलनातून मागणी मान्य न झालेस पुढे आंदोलनाची दिशा बद आंदोलन ऐवजी प्रेमनाथ अमर उपोषणाला सुरुवात केली आहे.

# पेणच्या दिव्यांग विद्यार्थ्यांनी साजरा केला देवेंद्र फडणवीसांचा वाढदिवस

**पेण प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज आपला वाढदिवस अत्यंत साधेपणाने साजरा केला. पेणमधील दिव्यांग विद्यार्थ्यांनी आग्रह केला असता, त्याला तत्काळ प्रतिसाद देत देवेंद्र फडणवीस यांनी ऑनलाईन पद्धतीने वाढदिवस साजरा केला.

सुहित जीवन ट्रस्ट पेण येथे दिव्यांग मुलांची शाळा आहे. या संस्थेच्या विद्यार्थ्यांनी देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस आज साजरा केला. देवेंद्र फडणवीस हे सातत्याने दिव्यांगाच्या बाबतीत सहकार्याची भूमिका घेतात. आमच्या संस्थेला सुद्धा त्यांनी मोठी मदत केली, असे संस्थेच्या अध्यक्षा डॉ.सुरेखा पाटील यांनी सांगत या मुलांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संवाद साधण्याचा आग्रह धरला. त्यांच्या विनंतीला फडणवीस यांनी मान देत त्यांच्याशी संवाद साधला, त्यांचे आभार मानले आणि त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छाही दिल्या.



दरम्यान, आज देवेंद्र फडणवीस यांना देशभरातील नेत्यांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, उपराष्ट्रपती जयदीप धनगड, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस, केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव, हरदीपसिंग पुरी, पियुष गोयल, माजी राज्यपाल भगतसिंग कोश्यारी, उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रवादी कॉंग्रसचे अध्यक्ष सुनील तटकरे, कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, सदाभाऊ खोत, महादेव जानकर, अभिनेते प्रसाद ओक, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंग धामी, नारायण राणे यांच्यासह अनेक नेत्यांनी फोन करुन शुभेच्छा दिल्या.

तसेच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, शिवराजसिंग चौहान, रामदास आठवले, श्रीपाद नाईक, पंकज चौधरी, अर्जून राम मेघवाल, प्रतापराव जाधव, डॉ. जितेंद्र सिंग, जी. किशन रेड्डी, किरण रिजिजू, अन्नपुर्णा देवी, ज्युएल ओराम, प्रल्हाद जोशी, डॉ. वीरेंद्र कुमार, सर्वानंद सोनोवाल, जितनराम मांझी, धर्मेंद्र प्रधान यांच्यासह अनेक केंद्रीय मंत्री तसेच योगी आदित्यनाथ, मनोहरलाल खट्टर, हेमंत बिस्वा शर्मा, डॉ. मोहन यादव, भजनलाल शर्मा, डॉ. प्रमोद सावंत यांच्यासह अनेक राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी सुद्धा फडणवीस यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.


## टि.सी. हरवला आहे

श्रीकृष्ण श्रीकांत लोकरे
रा.माळेगाव ता केज जि बीड
येथील रहिवासी असून त्याचा
जीवन शिक्षण विद्यालय
केज ता.केज १२ वी पासचा
टि.सी. दि.१५ जुलै.२०२४
रोजी केज ते बीड बस प्रवासा
दरम्यान हरवला आहे. तरी
सापडल्यास खालील नंबरवर
संपर्क साधा.
मो.न.८७६७०९६८७३

## "सार विचार" पुस्तकाचे प्रकाशन सोहळा संपन्न

नवी मुंबई : आग्रोली गावातील सुधीर गोरखनाथ पाटील यांच्या "सार विचार" या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत यांच्या हस्ते अग्रोळी येथील कॉ. बि. टी. आर. भवन ग्रंथालय येथे संपन्न झाला. या पुस्तक प्रकाशन सोहळ्यास माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत,आग्रोळी गावातील ग्रामस्थ बाळकृष्ण म्हात्रे, अरुण डोंगरे, श्रावण म्हात्रे, राजेश पाटील, प्राध्यापक मारुती मल्लापूरकर,पांढरी टोपी प्रकाशनचे प्रकाशक अनंतकुमार गवई आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन गजानन म्हात्रे यांनी केले विनय उर्फ बंडू मोरे यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्या प्रसारक हायस्कूलचे माजी प्राचार्य सन्माननीय सोनावणे सर होते. या वेळी दशरथ भगत म्हणाले की, सार विचार हे पुस्तक आज युवकांना प्रेरणादायी ठरणारे आहे. मोठे ग्रंथ, पोथी वाचनण्यास आज कुणालाही वेळ नाही. धर्मग्रंथांच्या मंथनातून निघालेले सार या पुस्तकात आहे. आपण वाचन कला आत्मसात केल्यास भविष्यात काहीतरी जीवनात करू शकतो. त्यासाठी आजच्या युवकांना वाचन करणे गरजेचे असल्याचे भगत यांनी सांगितले. नवी मुंबई महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी, लेखक,कवी महेंद्र कोंडे म्हणाले की, छोटी छोटी वाक्यरचना हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे.

## किशोर वीर यांना आयआयटी तिरुपती येथून पब्लिक पॉलिसी मध्ये पदव्युत्तर पदवी प्रदान



**बीड /प्रतिनिधी** आयआयटी,भारतीय प्रौद्योगिक संस्थान तिरुपती, येथून किशोर बबन वीर यांना पब्लिक पॉलिसी मध्ये पदव्युत्तर पदवी मिळाली. तसेच त्यांची वर्ल्ड रिसॉर्स इन्स्टिटयूट मध्ये जुनिअर प्रोग्राम असोसिएट म्हणून निवड झाली आहे. WRI हि संस्था पूर्ण जगात मानव कल्यानासाठी काम करते. बीड शहराजवळील एका छोट्याशा कर्झणी गावातील बबन वीर यंच्या शेतकरी पुत्राला हा मान मिळाला आहे. शैक्षणिक अभ्यास, जिद्द, चिकाटी, एकाग्रता व काहीतरी करण्याची ज्यांच्यामध्ये धमक असते. त्याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणून या छोट्याशा ग्रामीण भागातील विद्यार्थ्याकडे पाहिले जात आहे. त्याचा आदर्श सर्वांनी घेणे आवश्यक आहे. त्याचे कर्झणी गावात सर्व स्तरातून कौतुक व स्वागत,अभिनंदन होत आहे.

## जय्यत तयारी; दिव्य जागृती संस्थानच्या वतीने परळीत मंगळवारी गुरूपोर्णिमा महोत्सव
## जिल्ह्यातील ५ हजार भक्तांच्या उपस्थितीत रंगणार गुरु पौर्णिमा; २५ वर्षांपासूनची कायम

**परळी वैजनाथ/प्रतिनिधी**
दिव्य जागृती संस्थानच्या वतीने आज मंगळवार दिनांक २३ जुलै रोजी गुरूपौर्णिमेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. परळीत दिव्य ज्योती जागृती संस्थानची गुरूपौर्णिमेची २५ वर्षांपासून ही परंपरा सुरु आहे. पंचम ज्योतिर्लिंग श्री वैद्यनाथ मंदिरजवळ असलेल्या हालगे गार्डन येथे जय्यत तयारी करण्यात येत आहे. या कार्यक्रमास बीड जिल्ह्यातून ५ हजार भाविक येणार आहेत. दिव्य जागृती संस्थानच्या वतीने दरवर्षी गुरूपौर्णिमेचा उत्सव दरवर्षी साजरा केला जातो. त्यानुसार यंदा उद्या २३ जुलै रोजी सकाळपासून विविध कार्यक्रम होणार आहेत. सकाळी 9 वाजता भारतीय संस्कृती नुसार वेद मंत्राचे उच्चारण होणार आहे. सकाळी १० वाजता गुरू महाराजांची आरती होईल. १०.३० वाजता सत्संग प्रवचन, भजन होणार आहे. दिल्ली येथील गुरु महाराजांच्या शिष्यांचे यावेळी प्रवचन होणार



आहे. त्या अनुषंगाने कार्यक्रमाची जय्यत तयारी केली जात आहे. गुरुपौर्णिमेनिमित्त गुरू महाराजांच्या आरतीसह, प्रवचन होणार असल्याने भाविक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. गुरुंचे स्थान प्रत्येक भक्त गणांच्या मनात अढळ आहे. गुरूने दाखवलेल्या मार्गाने चालून जीवनाचा उद्धार करून घेण्याचा प्रत्येकाचा संकल्प असतो. त्याच संकल्पानुसार गुरू प्रती असलेली निष्ठा, प्रेम व्यक्त करण्यासाठी गुरुपौर्णिमा उत्सव साजरा केला जातो. त्यामुळे बीड जिल्ह्यातील अधिकाधिक गुरू महाराजांच्या भक्तगणांनी गुरू पौर्णिमा उत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन दिव्य जागृती संस्थान परिवाराने केले आहे. बीड जिल्ह्यात गुरू महाराजांचे भक्तगण मोठ्या प्रमाणात आहेत. या शिष्यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्याचाच एक भाग म्हणून गुरु पौर्णिमेचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जाणार आहे. दिव्य ज्योति जागृती संस्थानच्या परळी शाखेच्या वतीने गुरू महाराजांचे कार्यक्रम घेतले जातात. गुरु-भक्तांची मोठी परंपरा राहिली आहे. महिला, पुरुष भक्तांना बसण्यासाठी कक्ष उभारणी हालगे गार्डन, परळी वैजनाथ होणाऱ्या गुरु पौर्णिमा उत्सवाची जय्यत तयारी करण्यात येत आहे. त्यामध्ये डेकोरेशन, सत्संगाच्या ठिकाणी महिला, पुरुष भक्तांना बसण्यासाठी कक्ष उभारणी, भजन, प्रवचनासाठी स्टेज उभारणी, महाप्रसाद वाटप कक्ष अशी तयारी करण्यात येत आहे. दरवेळीच्या तुलनेत यंदा भक्तगण अधिक संख्येने येणार आहेत.

## राणूबाईची वाडी येथे अर्जुन महाराज लाड यांचे कीर्तन संपन्न.



येवता/प्रतिनिधी
केज तालुक्यातील राणूबाईची वाडी येथे दि२०शनिवार रोजी रात्री आठ ते दहा वेळेत संग्राम सुशील नागरगोजे यांच्या नियोजनातून ह.भ.प.व्याकरणाचार्य श्री. अर्जुन महाराज लाड गुरुजी यांचे कीर्तन संपन्न झाले कीर्तनरुपी सेवेसाठी अभंग कुळी कन्या पुत्र होती सात्विक तयाचा हरिक वाटे देवा गीता भागवत करिती श्रावण अखंड चिंतन विठोबाचे तुका म्हणे मज घडोत्यांची सेवा तया माझ्या देवापार नाही आपुलिया हिता जो असे जगता धन्य माता पिता तयाचिया लाड गुरुजींनी सत्य हे कधीही मालवत नाही सर्वांनी नेहमी खरे बोलावे सर्वांनी प्रेमाने वागावे अशा अनेक प्रकारचे विविध दृष्टांत देत कीर्तन रुपी सेवा सादर केली.

## महसूल कर्मचाऱ्यांचा संप राज्यकर्त्यांच्या निष्क्रिय कारभारामुळे चिघळला सर्वसामान्याची गैरसोय दूर करा अन्यथा चक्काजाम केला जाईल

गंगापूर/प्रा संजय तुपे राज्यकर्त्यांच्या निष्क्रिय कारभारामुळे महसूल कर्मचाऱ्यांचा संप चिघळला असून याचा फटका सामान्य जनतेला बसत आहे हा संप तात्काळ मिटवा आणि विद्यार्थी व शेतकऱ्यांची गैरसोय दूर करा नसता राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने जिल्हाभर चक्काजाम आंदोलन करण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे जिल्हा संघटक वाल्मिक शिरसाठ यांनी गंगापूर येथील आंदोलना प्रसंगी बोलताना दिला.महसूल कर्मचाऱ्यांचा संप मिटवून सर्व कर्मचाऱ्यांना तात्काळ कार्यालयात रुजू होण्याचे आदेश द्या, सर्वसामान्य जनतेची, विद्यार्थ्यांची रखडलेली कामे प्राधान्याने पूर्ण करून द्या, निराधार वयोवृद्ध लोकांची संजय गांधी निराधार योजनेची रखडलेली सर्व कामे तात्काळ मार्गी लावा, रुग्णांसाठी आवश्यक असलेले ऑनलाइन रेशन कार्ड तात्काळ देण्याची व्यवस्था करा, ग्रामीण भागात होत असलेली गौणखनिज चोरी, अवैध वाळू, मुरूम वाहतूक तात्काळ बंद करून संबंधितावर गुन्हे दाखल करा. कर्मचारी हजर होत नसतील तर कर्मचारी रुजू होईपर्यंत आम्हाला कर्मचाऱ्यांचा कार्यभार द्या अशी आग्रही मागणी करत आक्रमक झालेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी आज जिल्ह्याचे संघटक वाल्मिक शिरसाठ तसेच तालुकाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर निळ यांच्या नेतृत्वाखाली गंगापूर तहसील कार्यालयात खुर्ची ताबा आंदोलन केले.'तहसीलदार साहेब चार्ज द्या'... शेतकऱ्यांची विद्यार्थ्यांची प्रमाणपत्र मिळालीच पाहिजे,महसूल कर्मचाऱ्यांचा संप मिटलाच पाहिजे,आदी घोषणा देत तहसीलचा परिसर दणाणून सोडला. तहसीलदारांच्या दालनात जाऊन काम द्या काम द्या तहसीलदार साहेब काम द्या असे म्हणत गंगापूर तहसील कार्यालयाचा ताबा घेण्याचा प्रयत्न केला. तहसीलदारांनी संयमाची भूमिका घेत सर्व आंदोलकांची समजूत काढली संप वेळेत न मिटल्यास अतिरिक्त क्षेत्रीय महसूल कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून जनतेचे रखडलेली सर्व कामे मार्गी लावण्यात येतील. विद्यार्थ्यांचे रखडलेले शैक्षणिक व इतर प्रमाणपत्रे आजच प्राधान्याने देण्यात येतील असे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.आंदोलनात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे विधानसभा क्षेत्र अध्यक्ष सुनील धाडगे,शहराध्यक्ष अहमद पटेल,युवक तालुका अध्यक्ष किशोर गवांदे,महिला तालुकाध्यक्ष संजना महाडिक, अल्पसंख्यांक सेल तालुकाध्यक्ष रफिक पटेल, दिव्यांग सेल तालुकाध्यक्ष आर डी सोमसे, अनिस कुरेशी,किशोर परभणे, संकेत मैराळ, सलमान शेख भागिनाथ मोरे ,अशोक दारुंटे, आसाराम काजळे ,आशु शेख, बाळू भावले, नारायण साळवे, भाऊराव लांडे ,युसुफ बागवान यांच्यासह प्रमाणपत्रे काढण्यासाठी तहसील कार्यालयात आलेले विद्यार्थी, शेतकरी, निराधार महिला यांनी देखील स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदविला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077